# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्रं.मआविवि/पीआर/७३८/२०११ वृत्त प्रसिध्दीसाठी दि. २८ जुलै २०११

## महाविद्यालयांचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कडक धोरण

### मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

**नाशिक (दि.२८)** : राज्यातील वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे यंदाच्या वर्षी अधिक कडक धोरण स्वीकारले असून आजपावेतो संलग्नित विविध आरोग्य शास्त्र महाविद्यालयांच्या ७५ महाविद्यालयांचे त्रुटी पूर्ततेअभावी संलग्नीकरणाचे नूतनीकरण रोखले असल्याची माहिती विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी दिली.

सध्याच्या प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीत विद्यार्थी व पालकांना योग्य महाविद्यालयात प्रवेश घेता यावा व विद्यार्थ्यांना सुयोग्य शिक्षण मिळावे या हेतूने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर यांच्या पत्रकार परिषदेचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर, आयुर्वेद व युनानी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एस.जी. देशमुख, उपकुलसचिव डॉ.सुनिल फुगारे, जनसंपर्क अधिकारी श्री. स्वप्नील तोरणे उपस्थित होते.

शैक्षणिक दर्जाबाबत अधिक माहिती देतांना मा.कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर म्हणाले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण २८० महाविद्यालये संलग्नित आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ च्या कलम ६५ (४), ६८ व ६९ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार संलग्नीत महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे नूतनीकरण विस्तारीकरण करण्याची कार्यवाही विद्यापीठामार्फत केली जाते. त्यासाठी अधिनियमात असलेल्या उक्त तरतुदीस अनुसरुन विद्यापीठामार्फत स्थानिक चौकशी समित्यांमार्फत महाविद्यालयांची तपासणी केली जाते. स्थानिक चौकशी समित्यांनी सादर केलेले अहवाल विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केले जातात. विद्यापरिषदेमध्ये प्रत्येक महाविद्यालयाचा स्थानिक चौकशी अहवालावर चर्चा केली जाते व त्यानुसार संलग्नीकरणाचे नूतनीकरण संबंधीत महाविद्यालयांना प्रदान करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, विद्यमान स्थितीत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या बऱ्याच महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे कडून विद्यापीठास अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. मा. कुलपती कार्यालयातर्फे देखील वैद्यकीय शिक्षणाचा योग्य तो दर्जा राखण्यासाठी आरोग्य विद्यापीठातर्फे पावले उचलावीत असे सूचित करण्यात आले होते. या अनुषंगाने विद्यापरिषदेत सखोल चर्चा करण्यात येऊन चर्चेअंती विद्यापरिषदेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार किमान शैक्षणिक सोयीसुविधा व शिक्षकांची पर्याप्त संख्या विचारात घेऊन एकुण १५८ महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे नूतनीकरण प्रदान करण्यात आले व उक्त निकषांची पुर्तता करु न शकलेल्या एकुण १२२ महाविद्यालयांना तात्पुरत्या स्वरुपात संलग्नीकरणाचे नूतनीकरण प्रदान करण्यात आले नाही अशा महाविद्यालयांना एक महिना / तीन महिन्याच्या आत त्रुटींची पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले.

ते पुढे म्हणाले की, ज्या महाविद्यालयांबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या अश्या एकुण १० महाविद्यालयांना अचानक स्थानिक चौकशी समित्या नियुक्त करुन त्यांचेमार्फत निरीक्षण करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. आजमितीस त्रुटींपुर्तता केलेल्या एकुण ४७ महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे नूतनीकरण प्रदान केलेले आहे. ७५ महाविद्यालयांकडून अद्यापही त्रुटींची पुर्तता झालेली नसल्याने त्यांना संलग्नीकरणाचे नूतनीकरण प्रदान करण्यात आलेले नाही. विद्यापीठातर्फे अवलंबिलेल्या या धोरणांमुळे महाविद्यालयांमार्फत सकारात्मक कामगिरी करण्यात आली. अनेक महाविद्यालयांनी त्रुटी पूर्तता करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना विद्यापीठातर्फे सर्वतोपरी सहकार्य करण्यात आले. या महाविद्यालयांतर्फे नव्याने शिक्षक नियुक्त्या करण्यात येऊन त्याला तातडीने मान्यता देण्यात आली.

ते पुढे म्हणाले की, ज्या महाविद्यालयांकडून त्रुटींची पुर्तता केली जात आहे अशा महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे नूतनीकरण प्रदान केल्यानंतर सदर यादी वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेतल्यास विद्यापीठाने घेतलेला उक्त निर्णय आरोग्य विज्ञान शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य वैद्यकीय शिक्षण मिळावे ज्यायोगे भावी डॉक्टर्सची चांगली पिढी निर्माण व्हावी असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने ज्या महाविद्यालयांनी त्रुटींची पुर्तता केली अशा महाविद्यालयांना तात्काळ संलग्नीकरणाचे नूतनीकरण प्रदान केले आहे. तसेच

विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांची त्रुटींची पुर्तता करणेसाठी विद्यापीठाने स्वाधीकारे महाविद्यालयांना मदत होण्याच्या दृष्टीने विशेष शिक्षक अभियान राबविले व या अभियानाच्या माध्यमातून एकुण २०५४ शिक्षकांना मान्यता प्रदान केली आहे. तसेच काही महाविद्यालयांना शिक्षक मान्यता करुन घेण्याबाबत चालना देऊन काही महाविद्यालयांकडून नियमित शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव मागवून प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर तात्काळ कार्यवाही करुन अशा शिक्षकांच्या नियुक्तीस शिक्षक मान्यता प्रदान करुन त्या माध्यमातून १२५२ शिक्षकांना मान्यता दिली आहे. अशा प्रकारे एकुण ३३०६ शिक्षकांच्या नियुक्तीस मागील सहा महिन्यात मान्यता प्रदान केली असल्याचे सांगितले. नर्सिंग विषयामध्ये पदव्युत्तर शिक्षकांचीच संख्या उपलब्ध नव्हती. महाविद्यालयांना शिक्षक उपलब्ध व्हावे यासाठी नर्सिंगच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा निकाल तातडीने जाहीर करुन १०५ एम.एस्सी. नर्सिंग अर्हताधारक शिक्षकांची उपलब्धता होऊ शकेल यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, विद्यापीठाने महाविद्यालयांच्या संलग्नीकरणाबाबत उपरोक्तप्रमाणे घेतलेला निर्णय महामहिम राज्यपाल तथा कुलपती यांना कळविण्यात आला आहे. तसेच आरोग्य विज्ञान विद्याशाखेच्या प्रथम वर्षाचे प्रवेश करणाऱ्या प्राधिकरणास (संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन व खाजगी विनाअनुदानीत वैद्यकीय व दंत महाविद्यालयांचे व्यवस्थापन संघटना - AMUPMDC) यांना, ज्या महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे नूतनीकरण प्रदान करण्यात आले आहे अशा महाविद्यालयांची यादी कळविण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थी व पालक यांच्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याबाबत त्यांनी अधिक माहितीसाठी विद्यापीठाचे संकेतस्थळ असलेल्या http://www.muhsnashik.com/academic/Affiliation_Regarding_Status_2011_12_250711.pdf वर भेट द्यावी असे सांगितले.

Suryakar

कुलसचिव

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## Affiliation Status of All Existing Health Sciences Colleges for Academic Year 2011-12 till 27th July 2011

| अ.क्र. | विद्याशाखा / अभ्यासक्रम | एकूण महाविद्यालयांची संख्या | संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास /विस्तारीकरणाच्या मान्यता दिलेल्या महाविद्यालयांची संख्या | त्रुटीपुर्ततेअभावी संलग्नीकरणाचे नुतनीकरण /विस्तारीकरण प्रलंबित असलेल्या महाविलयांची संख्या |
|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E |
| १ | वैद्यकीय | ३१ | ३१ | - |
| २ | दंत | २७ | २२ | ०५ |
| ३ | आयुर्वेद व युनानी | ६७ | ५७ | १० |
| ४ | होमिओपॅथी | ४५ | ३९ | ०६ |
| ५ | फिजिओथेरपी | २५ | १४ | ११ |
| ६ | ऑक्युपेशनल थेरपी | ०५ | ०१ | ०४ |
| ७ | बेसीक बी.एस्सी. नर्सिंग | ५७ | ३१ | २६ |
| ८ | पोस्ट बेसीक बी. एस्सी. नर्सिंग | १८ | ०८ | १० |
| ९ | बीएएसएलपी | ०४ | ०१ | ०३ |
| १० | बीपीओ | ०१ | ०१ | - |
| | एकुण | २८० | २०५ | ७५ |